# सुचना फलक

## सुशिक्षीत बेराजगारांच्या सेवा सहकारी संस्था प्रस्ताव आमंत्रीत

खालील तक्यात नमुद कार्यालयास स्वच्छता गृह व परीसरातील साफसफाईची कामे करण्याकरीता 3 कामगारांची आवश्यकता असून सदर कामगार 11 महिण्याच्या कालावधी करीता अपेक्षीत असुन हे काम सुशिक्षीत बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना, *शासन निर्णय* कौशल्य विकस, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक ईएसइ-2003/प्र.क्र.191/रोस्वरा-1 दिनांक 01/02/2006 नुसार काम वाटप समिती मार्फत द्यावयाची आहेत.

मा. विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन) लातुर यांना कार्यालयातील स्वच्छता गृह व परिसरातील साफसफाईची कामे करण्याकरीता 3 कामगारांची आवश्यकता असून सदर कामगार 11 महिण्याच्या कालावधी करीता अपेक्षीत आहे.

वरील कामाचे स्वरूप , कामाची व्याप्ती कामाच्या अटी व सेवा शर्ती इत्यादीचा सविस्तर तपशिल जिल्हा कौशल्य् विकास रोजगार व द्योजकता मार्गदर्शन केन्द्र लातूर तसेच लातूर जिल्हा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संघ यांचे कार्यालयातील संबंधीत कक्षातही त्यांनी पाठविलेल्या या बाबतच्या पत्राच्या प्रति पहावयास उपलब्ध आहेत. तरी सेवा सहकारी संस्थानी आपले प्रस्ताव सादर करावेत. प्रस्तावासोबत नोंदणी प्रमाणपत्र व अन्य खालील प्रपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

1. सेवा सोसायटीच्या बँक पासबुकाची मागील 1 वर्षाची उलाढाल दर्शविणा-या पानाची प्रत.(पासबुकच्या पानाच्या प्रति सह)
2. सेवा सोसायटील मागल 1 वर्षात केलेल्या कामाचे कार्यादेश व अनुभवाची प्रपत्रे यांच्या प्रती.
3. सेवा सोसायटीने केलेल्या सर्व नियमीत लेखा परीक्षणाच्या प्रती .
4. सेवा सोसायटी कार्यरत असलेल्या ठिकाणचे पत्ता. (उदा. टेलीफोन बील लाईट बील,कि वा नगर सेवकाचा दाखला व इतर).
5. सेवा सोसायटी सदस्यांना ओळखपत्रे दिल्याबाबतचे व सर्व सदस्य क्रियाशील असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
6. संस्थेचे उद्येश व उपस्थितीची प्रत जोडावी.
7. संस्थेने नमुद केलेली माहिती व सोबत जोडलेल्या सर्व प्रपत्रातील माहिती सत्य असल्याबाबतचे सेवा सोसायटीचे अध्यक्षांचे प्रमाण पत्र सोबत जोडावे.

तरी वरील कामां च्या अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या इच्छुक पात्र सेवा सहकारी संस्थानी आपले परीपुर्ण् व स्वतंत्र प्रस्ताव संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्रासह व सर्व अन्य आवश्यक प्रमाणपत्रासह **जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व द्योजकता मार्गदर्शन केन्द्र लातूर** यांचे कडे **दिनांक** 15/04/2017 कार्यालयील वेळेत **सायंकाळी** 05.45 पर्यंत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांचा अथवा प्राप्त प्रस्तावातील अन्य प्रपत्राचा स्वीकार केला जाणार नाही. असे सहायक संचालक जिल्हा कौशल्य् विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र खोरी गल्ली लातूर तथा सदस्य सचिव काम वाटप समिती हे कळवितात.

दिनांक :- 30/03/2017

ठिकाण :- लातूर

**सहाय्यक संचालक तथा सदस्य सचिव**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

मार्गदर्शन केंद्र, लातूर